## फौजदारी किरकोळ अर्ज क्र.१०५/२०२५ मधील निशाणी क्र.१ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज, अर्जदार यांनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ५०३ अन्वये दाखल करून जप्त मुद्देमाल परत मिळणेकामी विनंती केली आहे.

मुद्देमाल वाहनाचे वर्णनः-

| | | |
|---|---|---|
| १ | कंपनी – | बजाज ॲटो |
| २ | वाहन क्र. | एम.एच.०४, के.एक्स.४३३० |
| ३ | इंजिन नंबर | AZWPK35222 |
| ४ | चेसीस नंबर | MD2B47AX7PWK14647 |
| ५ | रंग | काळी पिवळी |
| ६ | अंदाजे किंमत | १,००,०००/– |

०२. अर्जदार यांनी त्यांच्या अर्जामध्ये कथन केले की, पाली पोलीस स्टेशन सी.आर.नं.९६/२०२५ प्राण्यांचा छळ प्रतिबंध अधिनियम १९६० चे कलम ११ (१)(एम),११(१)(एन) तसेच महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियम १८८७ चे कलम १२ (बी), १२, ४,५ या गुन्हयामध्ये अर्जदार यांचा बजाज ॲटो कंपनीची वाहन रजि. एम.एच.०४, के.एक्स.४३३० जप्त केलेला आहे.

०३. तपासिक अधिकारी आणि सहा.सरकारी वकील यांनी त्यांचे म्हणणे अनुक्रमे नि.क्र.७ आणि ८ कडे दाखल केले. तपासिक अधिकारी यांनी असे म्हणणे दिले की, अर्जदार यांना जप्त केलेला मुद्देमाल परत केल्यास तो दुसरे गुन्हे करण्याची, विक्री अथवा विल्हेवाट लावण्याची शक्यता व अर्जदार न्यायालयीन कामकाजात हजर राहतील याची खात्री देता येत नसल्याचे कथन केले. सहाय्यक सरकारी वकील यांनी, जप्त मुद्देमाल अर्जदार यांच्या ताब्यात दिल्यास अर्जदार हे जप्त मुद्देमाल विक्री करण्याचे

व फेरबदल करण्याची शक्यता आहे. तसेच सदरचा मुददेमाल इतर गुन्हयात वापरण्याची शक्यता आहे. त्यामुळे, प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली आहे.

०४. अर्जदाराचे विधिज्ञ व सहा.सरकारी वकीलांनी केलेला युक्तीवाद ऐकला. त्यांनी अर्जदार यांनी दाखल केलेली पावती, अर्जदार हे प्रस्तुत गुन्हयात आरोपी क्र.१८ असल्याचे दिसुन येते व एफआयआर मधील अनुक्रमांक ८४ वरील मुद्देमाल असल्याचे दिसून येते सदरची गाडी अर्जदार यांच्या कडून जप्त केली आहे. अर्जदार यांनी जप्त मुद्देमाल त्यांच्या मालकीचे दर्शविणेकामी त्यांनी ड्रायव्हिंग लायसन्स व्हेरिफाईड प्रत दाखल केली. रिक्षाचे टेंपररी रजिस्टर सर्टिफिकेटची डिजिटल प्रत दाखल केली. रिक्षा इंन्सुरन्स पॉलिसीची डिजीटल साईन प्रत (नि.१०) वर दाखल केली. आर.सी.बुक बाबत चे प्रतिज्ञापत्र (नि.१३) तसेच अर्जदार यांनी त्यांचे आधारकार्ड ची साक्षांकित प्रत दाखल केली. गु.र.क्र.९६/२०२५ ची प्रथम खबर अहवालाची प्रत दाखल केली आहे . उपरोक्त नमुद कागदपत्रांचे आधारे अर्जदार हे जप्त मुद्देमाल वस्तू खरेदी केल्याचे दिसून येते. सदरचा मुद्देमाल हा प्रथमगुन्हा अहवाल (FIR) मधील कथनानुसार अर्जदाराकडून जप्त केल्याचे दिसून येते सदरची गाडी अर्जदार यांच्या ताब्यातुन जपत केलेचे एफआयआर द्वारे दिसून येते. त्यामुळे अंतरीम ताबा अर्जदारास देणे न्यायोचित ठरते

०५. ***मा. सर्वोच्च न्यायालयाचे सुंदरभाई अंबालाल देसाई वि गुजरात राज्य, एआयआर २००३ एस सी ६३८*** या निवाडयामध्ये आवश्यकतेपेक्षा जास्त कालावधीसाठी जप्त मुद्देमाल तपासणी अधिकारी यांचे ताब्यात ठेवू नये असे निर्देश दिले आहेत. तसेच, प्रस्तुतचा ताबा हा अंतरीम आहे. त्यामुळे, खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येते.

## आदेश

०१. अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

०२. पाली पोलिस स्टेशन गु.र.क्र. ९६/२०२५ मधील मुद्देमाल म्हणजेच हयुंदाई मोटार इंडिया लि.या कंपनीची चारचाकी वाहन रजि. **एम.एच.०४, के.एक्स.४३३०** रिक्षा वाहन चा अंतरिम ताबा खालील अटींवर मुळ खटला निकाली निघेपर्यंत अर्जदाराला देण्यात यावा;

०३. अर्जदार यांनी इन्डेम्नीटी बॉण्ड रुपये ४,५०,०००/- चा द्यावा व त्यामध्ये सदरच्या वस्तू मधील **एम.एच.०४, के.एस्क. ४३३०** क्रमांक, **काळा पिवळा** रंग, बजाज ॲटो या कंपनीच्या वाहनामध्ये कोणताही बदल करणार नाही अशी हमी द्यावी.

०४. अर्जदार यांनी सदरची वस्तू न्यायालय आदेशीत करतील त्यावेळेस हजर करण्याची हमी द्यावी.

०५. अर्जदार यांनी सदरच्या चारचाकी वाहनामध्ये कोणताही बदल करणार नाही हस्तांतरीत करणार नाही असे हमीपत्र दयावे.

०६. अर्जदार यांना अंतरीम ताबा हा मुळ खटल्याच्या अंतीम निकालाच्या अधीन देण्यात येतो.

०७. तपासणी अधिकारी यांनी योग्य फोटो घेवून पंचनामा करुन जप्त मुद्देमाल वस्तू अर्जदार यांना द्यावी.

०८. या अर्जातील आदेश अर्जासहित पाली पोलिस स्टेशनच्या गु.र.क्र.९६/२०२५ च्या दोषारोपपत्रा सोबत जोडण्यात यावा.

अर्जदार यांनी वाहनाची नोंदणी प्रादेशीक परिवहन कार्यालयाकडून प्राप्त करुन या खटल्यात ४५ दिवसात दाखल करावे, अन्यथा तपासणी अधिकारी यांनी अर्जदार यांचे विरोधात वाहन नोंदणी करता चालविले या बाबत संबंधीत कायदयांतर्गत गुन्हा नोंदवावा.

**(खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला)**

SHIVRATRI RAJU ASHOK
Digitally signed by SHIVRATRI RAJU ASHOK
Date: 2026.03.17 16:18:17 +0530

पाली **(रा.अ.शिवरात्री)**

दिनांक :१७/०३/२०२६ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पाली

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file Order is same word to word as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | Ankush S. Waghmare |
| (b) | Court Name | CJJD & JMFC, Pali |
| (c) | Order signed by P.O.on | 17.03.2026 |
| (d) | Order uploaded on | 18.03.2026 |